स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानवविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणा—या शोध प्रबंधाची रूपरेखा

शीर्षक

नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातील कृषी जाणिवा व आंदोलक शेतकरीः एक अभ्यास
(निवडक कादंबरीच्या अनुषंगाने)

—ःसंशोधकः—

श्री. कुमार वसंत इंगळे
मु. पो. ता. जत.
जि. सांगली—416 404
मो. न. 9881903894

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते
सहा.प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख,
श्री गुरुबुध्दी स्वामी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुर्णा
ता. पुर्णा, जि. परभणी

संशोधन केंद्रः— मराठी विभाग
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

जून :— 2019

नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण साहित्यातील कृषी जाणिवा व आंदोलक शेतकरी यांचा अभ्यास

प्रास्ताविक :—

मराठी साहित्याला संपन्न अशी पंरपरा आहे. मराठी साहित्य समृद्ध असून ते व्यापक आहे. मानवाचे जगणे सुसह्य व्हावे या गरजेतून समाज निर्मिती झाली. समाज व्यवस्थित चालावा यासाठी संस्कृती निर्माण झाली, या संस्कृतीतून साहित्य उदयास आले. आणि साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले. मराठी साहित्याला अकराव्या शतकापासूनची परंपरा आहे. मराठी साहित्यामध्ये सतत स्थित्यंतरे होत गेली, व त्यात उत्तरोत्तर विविधता येत गेली. मौखिक साहित्यापासून सुरू झालेला प्रवाह आज विज्ञानाच्या सहाय्याने ई—बुकपर्यंत विकसित झाले आहे. मराठी साहित्याचे दोन प्रकार आहेत, 1)ललित साहित्य 2)ललितेतर साहित्य. ललित साहित्याचे उपप्रकार पडतात— कथा, कादंबरी, कविता, नाटक, ललितलेख, चरित्र आणि आत्मचरित्र इ. तर ललितेतर साहित्याचे इतिहास, भूगोल, सामाजिक शास्त्रे, भौतिकविद्या, धर्म, तत्त्वज्ञान, टीकात्मक लेख इ. प्रकार आहेत.

मराठी साहित्यात विविध प्रवाह प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, कामगार साहित्य, ग्रामीण साहित्य, मुस्लीम साहित्य, बालसाहित्य, दलित साहित्य असे अनेक प्रवाह मराठीत उदयास आले. ग्राम जीवनाचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष चित्रण या साहित्यातून झाले आहे, अशा साहित्याचा शोध घेण्यासाठी आपणाला महानुभावी साहित्यापर्यंत जावे लागते. 'दृष्टांत पाठा',लीळाचरित्र अशा महानुभावीय साहित्यांमधून आलेल्या कथांमधून शेती, शेतकरी आणि ग्रामीण जीवनाचे चित्रण नकळत का होईना झाले आहे. ''आधारिये परिसाचा दृष्टांत'' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. याच पद्धतीने नामदेव, तुकाराम, एकनाथ आदी संताच्या वाङ्मयातून शेतकरी जीवनाच्या काही छटा प्रकट होताना दिसतात. असे असले तरी जाणीवपूर्वक शेतकरी जीवनदर्शन घडवू इच्छिणाऱ्या साहित्याचा सलग प्रवाह विसाव्या शतकाच्या पूर्वार्धानंतरच दिसतो.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेती ही मुख्य व्यवसाय आहे. पशुपालन हा शेतीपूरक व्यवसाय आहे. एकंदरीत शेतकरी साकार होण्यासाठी कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्गसन्मुखता त्यातून निर्माण झालेले लोकमान्य घटक महत्वाचे ठरतात. या सर्वांमधून जगण्याची एक रीत साकार होत जाते. या रीतीचे चित्रण ज्या साहित्यात आढळते त्या साहित्यला कृषिनिष्ठ अथवा ग्रामीण साहित्य म्हणता येईल. शेतकरी जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या, किंबहुना ही कृषिसंस्कृती कुठल्यातरी अर्थव्यवस्थेची अंकित बनून राहिली आहे. शहरी जीवनाच्या डामडौलापुढे कृषिसंस्कृतीचे, कृषिजीवनाचे दुय्यमत्त्व पदोपदी प्रत्ययाला येते. यातून असंख्य प्रश्न निर्माण झाले आहेत. शेतीमालाच्या भावाचा प्रश्न, बी—बियांणाचा प्रश्न, जमीनीचे छोटे—मोठे तुकडे, पाण्यावरती धनदांडग्याची मालकी, शेतमजुरांचा आभाव, बेकारीचा प्रश्न इ. समस्येमुळे शेतकरी जीवनाची घडी आज विस्कटून गेली आहे. या सर्वांचा वेध घेण्याचा प्रयत्न साहित्यिक करीत असतात.

शेतकरी जीवन जाणिवेचा प्रारंभ सर्वप्रथम महात्मा फुले, यांच्या ''शेतकऱ्याचा आसूड'' या ग्रंथातून झाला. छिन्न–भिन्न होणाऱ्या कृषिजीवनासंबधीचा अंसतोष आणि आक्रोश यातून व्यक्त झाला. पुढे कृष्णराव भालेराव यांनी 'बळीबा पाटील' ही शेतकरी जीवनाशी संबधित कादंबरी लिहली. म. वि. रा. शिंदेनी 'शेतकऱ्यांची दुःस्थिती' हा शेतकऱ्यांच्या चिंतनाचा विषय मांडला आहेच, पण त्याही पलीकडे जाऊन त्यांनी काही महत्वाची मीमांसा केलेली आहे. विशेषतः शेतीमालाच्या भावाचा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. शेती करणे फायदेशीर ठरत नाही, तेंव्हा त्यांना संपही करता येत नाही अशा कात्रीत शेतकरी सापडलेला असतो, असे त्यांचे प्रतिपादन आहे. स्वातंत्रोत्तर काळातील शेतकरी साहित्य हे वास्तवाच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करते. सन 1970 –75 सालात महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट होत. संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळाने होरपळून निघालेला होता. त्यामुळे नव्याने शिकलेली पिढी अधिकच अंतर्मुख झाली हाती तेंव्हा शेतकऱ्यांची नवी पिढी आंदोलक बनू लागली.

नव्वदोत्तर शतकामध्ये यांत्रिकीकरण व जागतिकीकरणामुळे संपूर्ण मानवी जीवन बदलून गेले कृषी क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल झाला. यांत्रिकीकरणामुळे काही चांगले तर काही वाईट परिणाम कृषी क्षेत्रावर झाले. बी–बियाणे, रासायनिक खते, औषधांच्या किंमती भरमसाठ वाढल्याने शेती उत्पादन खर्च भरमसाठ वाढला. दलालांचा वापर वाढल्याने शेतकरी अधिकच भरडला जावू लागला. खाजगी सावकार आणि बॅका यांमध्ये शेतकरी उध्वस्त होवू लागला. जागतिकीकरणामूळे शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल किंमतीला विकत घेवून खाजगी कंपन्या उभ्या राहू लागल्या. त्यामुळे कित्येक शेतकरी भूमिहीन झाले. या सर्वांमूळे पूर्णतः कृषी जाणीवाच बदलून गेल्या त्याचे प्रत्ययकारी चित्र नव्वदोत्तर दशकामध्ये मराठी साहित्यात उमटू लागले.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी कायम आर्थिकदृष्ट्या असुरक्षित, अन्यायग्रस्त राहिला. त्यामुळे शेतकऱ्याच्या मनात आपण नागविले गेल्याची, असंतोषाची भावना सतत धुमसत राहिली. ही भावना आपल्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे मार्ग शोधत राहिली. त्यातून शेतकऱ्यानां मार्ग सापडला. तो म्हणजे आंदोलनाचा. अलिकडच्या काळात जागोजागी उभ्या राहिलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनांनी शेतकऱ्यांना एक अस्मिता प्राप्त करून दिली.

विषय निवडीमागची भूमिका :–

मी मुळात शेतकरी कुटुंबातील मुलगा असल्याने कृषी जीवन खूप जवळून पाहिले आहे. शेतकरी जीवन हे माझ्या जीवनाचे एक अविभाज्य घटक आहे. विद्यार्थी दशेत असताना ग्रामीण साहित्याचा खुप अभ्यास केला. शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, त्यांच्या समस्या, पाण्यासाठी व शेतीमाल भाव मिळणेसाठी केलेले आंदोलने मी जवळून पाहिले आहेत. कृषी संस्कृतीशी संबंधित असणारे सण, उत्सव, समांरभ, तेथील राजकारण–समाजकारण, शैक्षणिक व्यवस्था या सगळ्या गोष्टी मी जवळून पाहिल्या आहेत. ग्रामीण साहित्यामध्ये वेगवेगळ्याप्रकारे घडणारे निसर्ग दर्शन यामुळे कृषी जीवनाचा अभ्यास करण्याची ओढ मनामध्ये निर्माण झाली.

कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरण झपाट्याने झाल्याने कृषी समस्येमध्ये देखिल नवीनच प्रश्न निर्माण होत आहेत. यांत्रिकीकरण जरी झाले असले तरी आजही जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी असंख्य समस्यांनी ग्रासलेला आहे. अस्मानी व सुल्तानी संकट तर शेतकऱ्याच्या पाचवीलाच पुजलेले आहे. नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक, मानवी अडचणींना तोंड देत शेतकरी शेती हा व्यवसाय करीत आहे. खरा भारत हा खेड्यांतच वसलेला आहे. पंच्याहत्तर टक्के लोकसंख्या ही शेती या व्यवसायावर अवलंबून आहे.. शेतकऱ्यांच्या कष्टावरच शहरातील लोकांना अन्नधान्य, भाजीपाला, शेतीमाल मिळत असतो. जगाचा हा पोशिंदा स्वतः उपाशी राहून जगाला भाकरी मिळावी म्हणून जगत असतो. पण त्याच्यावरच उपासमारीची वेळ येत असते. ज्यावेळेस शेतकऱ्यांचा शेतीमाल कवडीमोलाला विकला जातो. त्याचा उत्पन्नखर्चही निघत नाही त्यावेळेस त्या शेतकऱ्याची कशी दयनीय अवस्था होते. याचीसुध्दा जाणीव ग्रामीण लेखकांना झाली. या कृषी क्षेत्रातील बदलत्या जाणिवा व समस्या लेखकांनी आपल्या साहित्याद्वारे मांडली आहे. अशा या दयनीय अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी व शेतीमालास योग्य भाव मिळाला पाहिजे यासाठी अनेक शेतकरी संघटना कार्यरत आहेत. आपआपल्या परीने शेतकऱ्यांचे प्रबोधन करीत आहेत. आपल्या न्याय हक्कासाठी शेतकरी मोर्चा, आंदोलने या मध्ये सहभागी होत त्याला रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. अशा या शेतकरी जीवनातील वैयक्तिक पातळीबरोबर अंतर्बाह्य आंदोलने आणि सामूहीक व संघटीतपणे निर्माण झालेली आंदोलने यांचे चित्रण मराठी साहित्यात कितपत झाले आहे हे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तूत प्रबंधात करावयाचा आहे. नव्वदोत्तर ग्रामीण साहित्यातून व्यक्त झालेल्या कृषी जाणिवा व आंदोलक शेतकरी केंद्रस्थानी ठेवून हे संशोधन करावयाचे आहे.

संशोधन विषयाचा पूर्वाभ्यासः—

यापूर्वी समग्र मराठी साहित्यामधून ग्रामीण शेतकरी जीवनाचा संशोधक पातळीवर अभ्यास केला आहे. त्याचबरोबर ''प्रा. ज्ञानदेव राऊत यांचा शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचा मराठी साहित्यावरील प्रभाव" हा प्रबंध सादर झाला आहे. ग्रामीण साहित्याचा वेगवेगळ्या अंगाने अभ्यास झाला आहे. परंतु नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातील कृषी जाणिवा व आंदोलक शेतकरी यावर अद्याप सखोल संशोधन झाले नाही. जागतिकीकरणानंतर ज्याप्रमाणे सर्व क्षेत्रावर बरा वाईट परिणाम झाला तसाच कृषी क्षेत्रावर देखील झाला. तंत्रज्ञानामुळे, सहकारातील अपप्रवृत्तीमुळे कृषी क्षेत्रावर दूरगामी परिणाम झाला. त्यामुळे संपूर्ण कृषी जीवनाच्या जाणिवाच बदलून गेल्या. समाजातील सर्व लोक आपल्या मागण्या, समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवंलब करताना दिसतात. पण शेतकरी एकतर आत्महत्त्येकडे किंवा आंदोलनाकडे वळतो. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडणारे साहित्य म्हणून शेतकरी साहित्य लेखनास प्रांरभ केला. नव्वदोत्तर शतकामध्ये मराठी साहित्यातील बदलत्या कृषी जाणिवा व आंदोलक शेतकरी यांचे चित्रण येऊ लागले. साधारणतः दीडशे वर्षापासून शेतकरी वेगवेगळ्या कारणांनी धगधगतो आहे. गेल्या दशकात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. ही वस्तुस्थिती आहे. शरद जोशी, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, रघुनाथदादा पाटील यांसारख्या काही नेत्यांनी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात

शेतकरी चळवळ उभी करून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. आपल्या वैचारीक लेखनातून शेतकऱ्यांच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तसेच आंदोलनाच्या माध्यमातूनही त्यांनी शेतकऱ्यांच्यात जागृती निर्माण केली. असे असले तरी आंदोलक शेतकऱ्यांच्या जीवनाचित्रणाची व असंतोषाची नोंद संशोधन पातळीवर प्रभावीपणे झालेली दिसत नाही.

संशोधन विषयाचे महत्व :–

मराठी वाचकाला सर्वात जास्त आवडणारा, जवळचा वाटणारा साहित्यप्रकार म्हणजे कथा – कादंबरी होय. कथात्मक साहित्यातून शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख, आगतिकता, लाचारी कष्टमय जीवन यांचे चित्रण केलेले असते. महात्मा गांधीजीनी खरा भारत हा खेड्यातच आहे हे जाणले होते, म्हणून त्यांनी जनतेला 'खेड्याकडे चला' हा संदेश दिला होता. सुरवातीच्या काळात काही लेखकांनी शेतकऱ्यांचे जीवन आपल्या कथात्मक साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला, परंतू शेतकरी व शेती यांचे खरे जीवन साहित्यात मांडता आले नाही. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा नंतर ग्रामीण भागातील पहिली पिढी शिक्षणाच्या निमित्ताने वाचू लागली. आपण जगलो ते वास्तव जीवन साहित्यात आलेचे नाही म्हणून त्यांनी लेखणी हातात घेतली आणि शेतकऱ्यांचे खरेखुरे जीवन खऱ्या अर्थाने साहित्यात येऊ लागले. नव्वदोत्तरी शतकामध्ये जागतिकीकरणामध्ये कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल झाला. वेगवेगळ्या मार्गाने शेतकरी देशोधडीलाच लागला. कृषी क्षेत्रात नविनच समस्या निर्माण झाल्या. पारंपारिक कृषी क्षेत्र पूर्णपणे बदलून गेले. हे बदलते ग्रामीण जीवन समर्थपणे मराठी ग्रामीण साहित्यातून व्यक्त होवू लागले. अस्मानी सुलतानी संकटामुळे शेतकरी कर्जबाजारी बनू लागला. सततच्या दुष्काळामुळे पाण्याची समस्या गंभीर बनू लागली. खाजगी सावकारीमुळे शेतकरी अधिकच त्रासला गेला त्यामुळे तो आत्महत्त्येचा स्वीकार करू लागला. साहित्यावर त्या–त्या काळाचा प्रभाव पडत असतो. त्यामुळे अनेक लेखकांनी बदलते ग्रामीण जीवन जाणिवा डोळ्यासमोर ठेवून तो आपल्या साहित्यामध्ये मांडू लागला. मराठी ग्रामीण साहित्यामध्ये या सर्वांचे चित्रण येवू लागले. आपल्या हक्कासाठी लढणारा शेतकरी आत्महत्त्येऐवजी आंदोलन, मोर्चे, उपोषण इ. मार्गाचा स्वीकार करताना दिसू लागला. आंदोलक शेतकऱ्यांच्या समस्या या संवेदनशील आहतेच शिवाय त्या सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्वपूर्ण आहेत. म्हणून शेतकऱ्यांचे दुःख जाणून घेण्यासाठी, बदलत्या कृषी जीवनाचा वेध घेवून समाजातील सर्व लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी नव्वदोत्तर मराठी साहित्यातील कृषी जाणिवा, आंदोलक शेतकरी व बदलते कृषी जीवनाचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते.

संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये :–

- मराठी ग्रामीण कादंबरीतील बदलत्या कृषी जाणिवा व आंदोलक शेतकरी यांच्या जीवनाची संकल्पना स्वरूप व त्याचे बदलते आकृतीबंध तपासणे.
- नव्वदोत्तर कृषी जीवनाचा वेध घेणे.

- नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातील ग्राम वास्तवाचा अभ्यास करणे.
- मराठी कादंबरी मधील शेतकरी आंदोलनाची पार्श्वभूमी अभ्यासणे.
- मराठी कादंबरीमधील आंदोलक शेतकऱ्यांचे वास्तव जीवन चित्रणांचा अभ्यास करणे.
- जगाचा पोशिंदा म्हणून आंदोलक शेतकऱ्यांचा विचार करण्यास आवाहन करणे. व त्यांचे महत्व पटवून देणे.
- यांत्रिकीकरणामुळे बदलत्या कृषी जीवनाचा अभ्यास करणे.
- कादंबरी व्यतिरिक्त वैचारिक पातळीवर आंदोलक शेतकऱ्यांचे जीवन चित्रण स्पष्ट करणे.
- आंदोलक शेतकऱ्याची भूमिका स्पष्ट करणे.
- आंदोलक शेतकऱ्याची कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक व भौगोलिक परिस्थितीचा परिणाम अभ्यासणे.
- शेतकऱ्यांना आंदोलक बनविणाऱ्या घटकांच्या परिस्थितीचा विचार करणे.
- जागतिकीरणामुळे निर्माण झालेले शेतकऱ्यांचे प्रश्न, व समस्या यावर उपाय नोंदविणे.
- अभ्यासांती हाती आलेल्या निष्कर्षाची मूल्यमापनात्मक पातळीवर नोंद घेणे.

संशोधन विषयाची गृहीतकेः—

याचबरोबर संशोधन कार्य यशस्वी पार पाडण्यासाठी संशोधनाची गृहितके डोळ्यासमोर ठेवावी लागतात. निष्कर्ष काढण्याच्या कामी निश्चित अशी दिशा असावी लागते. संशोधनाचे मूल्य निश्चित करण्यासाठी संशोधन कार्य चालू करण्यापूर्वी गृहितके मांडणे आवश्यक असतात. ही गृहितके संशोधनाला एक दिशा तर देतातच त्याचबरोबर शास्त्रीय पद्धतीने संशोधन करण्यासाठी गृहितके महत्वाची ठरतात. या दृष्टीने प्रस्तूत शीर्षकातंर्गत संशोधन करीत असताना पुढील गृहितके डोळ्यासमोर ठेवलेली आहेत.

- नव्वदोत्तर बदलत्या कृषी जाणिवांचा आराखडा निश्चित करणे.
- जागतिकीकरणामूळे बदलत्या कृषी जीवनाचा आढावा घेणे.
- मराठी कादंबरीतील कृषी जाणिवा, आंदोलक शेतकरी व शेतकरी जीवन चित्रण यांच्या अभ्यासाचा आराखडा निश्चित करणे.

- आंदोलक शेतकऱ्यांचे जीवन चित्रण करण्यास मराठी कादंबरी वाङ्मय प्रकार समर्थ आहे का? हे स्पष्ट करणे.
- आंदोलक शेतकऱ्यांची बंडखोरीची तीव्र भावना, शोषणाविरोधी प्रखर जाणीव मराठी कादंबरीतून कशा प्रकारे मांडले आहे याचा आढावा घेणे.
- आंदोलक शेतकऱ्यांची आत्मभान भाषा अभ्यासणे.
- यंत्रयुगामुळे बदलत्या कृषी जीवनाचा आढावा घेणे.
- कृषी जीवनाचे वास्तव दर्शन घडवणे.
- मराठी कादंबरीतून आलेल्या आंदोलक शेतकऱ्यांचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तिरेखांचा अभ्यास करणे.
- आंदोलक शेतकरी व शेतकरी जीवन यांच्या समस्यांची उकल करून त्याचं प्रश्न सोडविण्यास संघटीत पातळीवर झालेल्या प्रयत्नांचा शोध घेणे.
- आंदोलक शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जीवनावर झालेला परिणाम अभ्यासणे.

संशोधन विषयाची सामग्री :—

संशोधन करताना अनेक प्रकारच्या साधनांची उपलब्धता असावी लागते. सामग्री अभावी संशोधन कार्य व्यवस्थित पूर्ण होऊ शकत नाही. त्याचे निष्कर्ष नीट मांडता येत नाहीत. संशोधनासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट आवश्यक असते ती म्हणजे आवश्यक असणारी साधन सामग्री होय. ''मराठी कथात्मक साहित्यातील आंदोलक शेतकरी व बदलते कृषी जीवन चित्रणांचा अभ्यास'' या विषय संशोधनासाठी पुढील प्रकारची साहित्य सामग्री वापरणे अभिप्रेत आहे.

आंदोलक शेतकरी जीवन दर्शन घडविणारे कथा संग्रह, कादंबरी. संशोधन विषयाशी संबधित लेखकांच्या लेखनाविषयी माहितीपर लेख, काही संदर्भग्रंथ, समीक्षाग्रंथ, त्याचबरोबर संशोधन विषयाला पूरक अशी नियतकालिके, संस्कृतीकोश, मराठी विश्वकोश, मराठी वाङमय मंडळ साहित्य, वृत्तपत्रे, संकेतस्थळे इ. सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती :—

मराठी ग्रामीण साहित्यातील बदलत्या कृषी जाणिवा व आंदोलक शेतकरी हा विषय ग्रामीण साहित्याचा एक प्रवाह आहे. मराठी साहित्यातील आंदोलक शेतकरी व बदलत्या कृषी जीवनाशी निगडीत असणाऱ्या समस्या, प्रश्न, संकट, आपत्ती, व त्यांचे जीवनचित्रण अभ्यासण्यासाठी

समाजशास्त्रीय, मनोविश्लेषणात्मक, वर्णनात्मक व क्षेत्रीय संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाची प्रकरणानुरूप विभागणी :–

प्रकरण 1 ले :– मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना व स्वरूप

मराठी ग्रामीण साहित्याला मोठी पंरपरा असलेला साहित्यप्रकार आहे. कल्पिलेले व अनुभवलेले अनुभव जेंव्हा माणूस दुसऱ्याला सांगू लागला, तेंव्हा कथेचा जन्म झाला. कथा ही मौखिक स्वरूपात व लिखित स्वरूपात गोष्टीरूपाने सांगितली गेली. कथाविश्व हे अनेकपरींनी आणि अनेक प्रकारांनी संपन्न झालेले आहे. कल्पित कथा, पुराणे, अद्‌भुत कथा, लोककथा, कहाणी, दंतकथा, प्राणीकथा, परिकथा, दृष्टांतकथा, दिर्घकथा, लघुकथा, कादंबरी इ. कथात्मक साहित्याचे अनेक प्रकार आहेत.

कादंबरी साहित्यात घटनांचा अनुक्रम कथन केला जातो. लेखक तो विशिष्ट आशयसूत्रानुसार करत असतो. या ठिकाणी लेखक विशिष्ट जीवनदृष्टी स्वीकारून घटना घडवित असतो. त्याची गुंफण करीत असतो. या गुंफणीला एक मूल्यदृष्टी असते. त्यामुळे निवेदक विशिष्ट पद्धतीचा स्वीकार करून निवेदन करीत असतो. आपल्या निवेदनातून वाचकाच्या मनात एक गोष्ट तयार करत असतो. आशयसूत्र, कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, निवेदन आणि भाषा हे कथात्मक साहित्याचे पर्यायाने कथा कादंबरीचे मुळ घटक मानले जातात. कथात्मक साहित्यात या घटकांच्या आधारे लेखक एक अनुभवविश्व निर्माण करतो. यामध्ये माणसामाणसामधील परस्पर संबधाचे, त्याच्या जीवन निष्ठांचे, श्रध्दा–मतप्रणालीचे चित्रण तो करीत असतो. माणसाचे स्वतःशी, कुटुंबाशी समाजाशी निसर्गाशी व इतर घटकांशी येणाऱ्या संबधाचे चित्रण तो आपल्या कथाविश्वात करीत असतो. या विविध प्रकारच्या परस्पर संबधातून मानसिक, सामाजिक, राजकीय, निसर्गनिष्ठ इ. स्वरूपाचे मानवी अनुभवविश्व साकारले जाते. त्यातूनच कथात्मक साहित्याचे रूप उभे रहाते.

प्रकरण 2 रे :– नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील कृषी जाणिवा.

नव्वदोत्तरी कालखंडामध्ये एकुणच मानवी जीवनात, पर्यायाने ग्रामीण जीवनात प्रंचड उलथापालथी झाल्या. माहिती तंत्रज्ञान व आधुनिकिकरण म्हणजेच जागतिकीकरणाचा परिणाम सर्वच क्षेत्रावर झाला. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रावरसुध्दा परिणाम झाला. त्यामुळे एकूणच कृषी जीवनाच्या जाणिवाच बदलून गेल्या. नव्वदोत्तरी ग्रामीण जीवन अत्यंत गुंतागुंतीचे व दृष्टचक्रात भरडले जाणारे आहे. ग्रामीण जीवन म्हणजे एकीकडे आश्वासनांची खैरात असून स्वर्गसुख वाटणारी आहे. पण प्रत्यक्षात अतिशय दाहक होरपळ आहे. नव्वदोत्तरी ग्राम जीवनाच्या कृषी जाणिवा अधिक भेसूर आहेत. शेतकऱ्यासमोर अनेक समस्या उभ्या आहेत. अस्मानी–सुलतानी संकटे, अल्पभूधारक शेतकरी, शेतीचे तुकडे पडणे, दुष्काळ, सावकारी कर्ज, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, शेतीमालाचे भाव, महागाई, बेकारी, वाढता भ्रष्टाचार, सहकार क्षेत्रात बोकाळलेला भ्रष्टाचार त्यातुन निर्माण होणारी

आंदोलने अशा अनेक समस्या नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न झाला आहे. नव्याने वेगळ्याच कृषी जीवन जाणिवा निर्माण झाल्या आहेत. त्याचा वेध प्रस्तुत प्रकरणात घ्यावयाचा आहे.

नव्वदोत्तरी ग्राम जीवनात केवळ शेतीचाच प्रश्न राहीला नाही तर ग्रामीण भागातील भूक, दारिद्रय, अज्ञान, शोषण, सुशिक्षित बेकारी यामुळे भरकटलेला तरुण, राजकीय भूलथापा याबरोबरच असे विविध अनुभवाचे चित्रण नव्वदोत्तरी साहित्यात आले आहे. आज खेडे सर्वच बाजूंनी उद्‌ध्वस्त होत आहेत. पाश्चात्य व शहरी संस्कृतीचे आक्रमण ग्रामीण संस्कृतीवर होत असून त्यामुळे ग्राम जीवनात नवीनच जाणिवा निर्माण झाल्या आहेत. तरुणांमधील व्यसनाधिनतेमुळे व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक दुर्दशा, अंधश्रध्दा, जाती–जातीमधील बदलते परस्परसंबंध, जुन्या नव्या मुल्यांमधील संघर्ष यामुळे ग्रामीण जीवन ढावळून निघाले आहे. याचा शोध नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीमधून घ्यावयाचा आहे.

प्रकरण 3 रे :– मराठी साहित्यातील शेतकरी आदोंलनाची पार्श्वभूमी.

महात्मा फुले यांनी ''शेतकऱ्यांचा आसूड'' हा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. त्यांनतर महर्षी. वि. रा. शिंदे यांनी आपल्या वैचारिक लेखनामधून आंदोलक शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, आणि महर्षी. वि. रा. शिंदे इ. नी शेतकरी आंदोलन विषयक ललित आणि वैचारिक लेखन केले. महात्मा फुले याच्या काळापासून शेतकरी साहित्य लिहले जात होत त्याकाळात वेगळे साहित्य म्हणून दखल घेतली नसली तरी एकोणिसाव्या शतकानंतर ग्रामीण साहित्याची मात्र बऱ्यापैकी दखल घेतली गेली. आणि एकूण मराठी साहित्यात शेतकऱ्यांच्या बाबतीत अनुकूल अभिप्राय नोंदवू लागले. साहित्याच्या प्रांतात चळवळी कशा निर्माण होतात याचे विवेचन स्वंतत्रपणे करता येईल. मात्र जीवनामध्ये जेंव्हा काही परिवर्तने होतात, किंवा काही असंतोष निर्माण होतो तेंव्हा तेंव्हा साहित्याच्या जगतामध्ये चळवळीची भाषा सुरू होते. या चळवळीतून मनुष्य आंदोलक, आक्रमक बनू लागतो.

सन 1971 ते 1975 पर्यंत महाराष्ट्र दुष्काळात होरपळून निघालेला होता. त्यामुळे नव्याने शिकलेली शेतकऱ्यांची नवी पिढी अधिकच अंतःर्मुख झाली होती. ज्या कृषी व्यवस्थेचा गौरव केला जातो, तिचे तर धिंडवडे निघाले होते. यानिमित्ताने अनेक लेखक जागरूक झाले. शेतकऱ्यांचे नवे वास्तव जाणवायला लागल होते. जमीनीचे छोटे–छोठे तुकडे, सुशिक्षितांची बेकारी, महागडी नवी बी–बियांणे, खते, निसर्गाचा लहरीपणा, शासनाची धोरणे असे अंसख्य प्रश्न उपस्थित होत होते. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळत नव्हता, त्याच्या उत्पन्नातून केलेला खर्चही कधी–कधी निघत नव्हता असा हा अन्नदाता स्वतः उपाशी राहत होता. पण शहरातल्या लोकांना शेतकऱ्यांच्या या दुःखाची जाणीव नव्हती. म्हणून सन 1980 च्या दशकात 'शरद जोशी' सारख्या शेतकरी नेत्याने शेतकऱ्यांच्या 'शेतकऱ्याच्या शेतीमालास रास्त भाव' या एककलमी कार्यक्रमासाठी विविध आंदोलने उभी केली. आजच्या काळात रघुनाथ पाटील, राजू शेट्टी, सदाभाऊ खोत यासारख्या

शेतकरी नेत्यानी अनेक आंदोलने उभी करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या विषयी लेखन करून शेतकऱ्यांच्या मनात स्वतःच्या हितासाठीची सजगता व लढण्याची उमेद जागी केली. सन 1975 नंतर भास्कर चंदनशिव, रां. रं. बोराडे, आंनद यादव, विश्वास पाटील, महादेव मोरे, शंकर पाटील, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, विठ्ठल वाघ, अशोक कोळी इ. लेखकांनी आपल्या कथा–कादंबऱ्यातून आंदोलक शेतकऱ्यांच्या व्यथा, जीवन चित्रण मांडण्याचा प्रयत्न केला.

प्रकरण 4 थे :– नव्वदोत्तरी ग्रामीण कादंबरीतील आंदोलक शेतकरी.

कादंबरीसारख्या वाङ्मय प्रकारातून विस्तृतपणे शेतकरी वर्गाचे चित्रण आले आहे. ग्रमीण कादंबरीतून निसर्ग, देव–देवता, अंधश्रध्दा, दुष्काळ, पाणी समस्या, लहरी हवामान, शेतमजूर, शेतमालाला कमी हमीभाव यातून निर्माण झालेले दुःख, दैन्य–दारिद्रय, कौटुंबिक ताण–तणाव, बेकारी हरवत चाललेली माणूसकी, लुबाडणूक करणारा दलाल, यांचे चित्रण मराठी कादंबरीत दिसून येते.

तानाजी राऊ पाटील यांची ''आभाळ'' या कांदबरीत गोपाळ आणि सजी या शेतमजुराची दशा मांडली आहे., सदांनद देशमुख यांची ''तहान'' या कादंबरीतून बबनसारखा शेतकरी वाईट मार्ग स्वीकारताना दिसतो. ''बारोमास'' मधून सुशिक्षित तरूणाची व्यथा, आक्रमकता स्पष्ट केली आहे. मोहन पाटील यांची ''साखरफेरा'' या कादंबरीत किशा खोत हा आंदोलक शेतकऱ्याचे प्रतिनिधित्व करताना दिसतो, अशोक कोळी याची ''पाडा'' या कादबरीत केळी उत्पादक असणारा आंदोलक शेतकरी चांगदेव तापकीर याची व्यथा मांडली आहे. ''रिक्त अतिरिक्त'' या रां. रं. बोराडे लिखित कादंबरीत आंदोलनग्रस्त शेतकरी नाथाप्पाची दुर्दशा दिसून येते. त्याचबरोबर रविंद्र शोभणे यांनी आपल्या ''पांढर'' व ''कोंडी'' या कांदबरीतून शेतकऱ्यांची फरफट मांडली आहे. कृष्णात खोत यांच्या ''गावठाण'', चंद्रकुमार नलगे यांची ''देवाची साक्ष'', शंकर सखाराम यांची ''एस.इ.झेड'', अनंत भोयर यांची ''आभाळझुंज'', शेषराव मोहिते यांची ''धुळपेरणी'', इ. कांदबरीमधून आंदोलक शेतकऱ्यांचे दर्शन घडते.

प्रकरण 5 वे :–मराठी कथात्मक साहित्यातून व्यक्त झालेले कृषी जीवन–कृषी संस्कृती

मराठी कादंबरीतून व्यक्त झालेल्या शेतकऱ्यांच्या वास्तव चित्रणा बरोबरच त्यांचे कृषी जीवन व कृषी संस्कृती यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. जागतिकीकरण, औद्योगिकीकरण, बेकारांच्या संख्येत होणारी वाढ, गावातील राजकारण, त्यातून निर्माण होणारी गुंडगिरी, व्यसनाधिनता, गटबाजी या सर्वांचा बळी ठरणारे शेतकरी जीवन मराठी कादंबरी वाङ्मयातून दिसून येते.मराठी साहित्यामधील शेतकरी आंदोलनात सहभागी झाल्याने त्याच्या कौटुंबिक जीवनाकडे किंवा वैयक्तिक जीवनाकडे दुर्लक्ष होते. त्या शेतकऱ्यांबरोबर त्याच्या कुंटूबातील सदस्यांची ओढाताण होत असते. आंदोलनात सहभागी झाल्याने त्याला प्रसंगी जेलमध्ये जावे लागते याचे उदाहरण म्हणजे अशोक कोळी यांच्या

''पाडा'' कांदबंरीत चांगदेव तापकीरला तुरूंगवास होतो. त्याच्या मुलीचे लग्न मोडते, मुलीचा हुंडाबळी जातो, त्याच्या बायकोचा मृत्यू होतो. अशाप्रकारे आंदोलनग्रस्त शेतकऱ्याचे जीवन चित्रण लेखक आपल्या साहित्यातून मांडताना दिसतात.

'विषवृक्षांच्या मुळ्या', 'बुढाई', 'बस्तान', 'लिंगाड', 'खांदेपालट', 'ईजाळ', 'हाल्या हाल्या दुध दे', 'नवी वारूळ', 'जांभळडव्ह', 'पीकपाणी', 'बळीवंत' इ. कलाकृतीतून शेतकरी जीवनाच्या उपेक्षांची पाळेमुळे नागर संस्कृतीत, भांडवली अर्थव्यवस्थेत आहेत हे लेखकांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. विविध समस्या निर्माण झाल्याने शेतकरी जीवन वैफल्यग्रस्त होताना दिसते. जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आंदोलनाचा मार्ग स्वीकारतो, आक्रमक बनतो ही मोठी शोकांतिका आहे. या सर्व गोष्टीमधून एवढेच दिसून येते की शेतकरी जीवनाचे दाहक वास्तव साहित्याद्वारे वाचकांसमोर उभे करताना दिसतात. शेतकऱ्यांची मुले, जनावरे, शिक्षण, नैसर्गिक आपत्ती कौटुंबिक जीवन यासर्वांचे चित्रण होताना दिसते. यातुन व्यक्त झालेल्या कृषी जीवनाचा व कृषी संस्कृतीचा अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण 6 वे :– मराठी कादंबरीतील वाङ्मयीन सौंदर्य.

प्रत्येक साहित्यप्रकारात वापरली जाणारी भाषा हा एक स्वंतत्र अभ्यासाचा विषय असतो. त्या त्या साहित्यप्रकारातून भाषाविशेषांचा वेगळा नमुना शोधता येतो. मराठी कादंबरीतील आंदोलक शेतकऱ्यांची व शेतकरी पात्रे स्वतःचे असे तत्त्वज्ञान सांगत असतात. उपमा–उपमाने, दृष्टांत, म्हणी, वाक्प्रचार, यांनी प्रत्यक लेखक आपली कलाकृती अलंकृत करीत असतो. प्रत्येक कथात्मक साहित्यात भाषाविशेषांचे वेगवेगळे नमुने सापडत असतात. मराठी कादंबरीतील व्यक्त झालेल्या कृषी जाणिवा, आंदोलक शेतकरी व शेतकरी जीवन यांचा अभ्यास करताना आपण प्रादेशिक, ग्रामीण बोलीभाषेचा अभ्यास करणार आहोत. या कथात्मक साहित्यात शेतकरी निवेदनासाठी व संवादासाठी वापरलेली भाषा, व रोजची बोलली जाणारी भाषेची वैशिष्ट्ये पाहणार आहोत. भाषा ही अनुभवाचा संस्कार करणारी शैली आहे. मराठी तील काही लेखकांनी वेगवेगळ्या प्रदेशातील बोलींचा वापर करून तेथील प्रादेशिक जीवन साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. रां. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, ना. धो. महानोर यांनी मराठवाड्याच्या बोलीचा वापर केला आहे. तर व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, आंनद यादव यासारख्या लेखकांनी कोल्हापूरकडील बोलीभाषेचे वेगळेपण हेरले आहे. वऱ्हाडी बोलीचा वापर काही लेखकांनी आपल्या शेतकरी कथा – कादंबरीच्या लेखनासाठी केला आहे. उद्धव शेळके, मनोहर तल्हार, रविंद्र शोभणे, प्रतिमा इंगोले आदी लेखकांनी अतिशय समर्थपणे वैदर्भी बोलीभाषेचा वापर केला आहे.

मराठी कादंबरीतील शेतकरी स्वतःचे जीवनानुभव सांगणारे आहेत. भाषाशैलीचा अभ्यास करताना शेतकरी कुंटुबातील भाषा, ग्रामीण भांडणाची भाषा, आंदोलन, मोर्चा, सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांची भाषा, पात्रांच्या बोलण्याच्या विशिष्ट लकबी, आंदोलनातील, मोर्चातील घोषणा हाही भाषेचा वेगळा बाज दाखवितात.

प्रकरण 7 वे :– उपसंहार.

अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष या प्रकरणात नोंदविले जातील. प्रबंधाच्या शेवटी साधनग्रंथ सूची, संदर्भग्रंथ सूची, मासिके, परिशिष्टे, नियतकालिकांची सूची व गरज भासल्यास छायाचित्रे जोडण्यात येतील.

प्रस्तुत संशोधनामध्ये सामान्यपणे वरीलप्रमाणे प्रकरण रचना अभिप्रेत आहे. तथापी अभ्यासाअंती संशोधन करीत असताना वरील प्रकरणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते
सहा.प्राध्यापक,
मराठी विभागप्रमुख,
श्री गुरुबुध्दी स्वामी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
पुर्णा ता. पुर्णा, जि. परभणी

संशोधक,

श्री. कुमार वसंत इंगळे
रामराव नगर, जत.
मु. पो. ता. जत.
जि. सांगली–416 404
मो. न. 9881903894

साधनग्रंथ सूची

कादंबरी:

- पाटील मोहन :– साखरफेरा – पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
  बस्तान – सायन पब्लिकेशन
  लिंगाड आणि खांदेपालट – मौज प्रकाशन
- कदम रूद्राक्ष :– महापूर – जनशक्ती वाचक आंदोलन प्रकाशन.
- मोहिते शेषराव :– अस जगण तोलाच – देशमुख ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, प्रा. लि.
  धुळपेरणी – देशमुख ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, प्रा. लि.
- देशमुख सदानंद :– तहान – पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
  बारोमास – पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
- पाटील विश्वास :– झाडाझडती – राजहंस प्रकाशन
  पांगिरा. – राजहंस प्रकाशन
- बोराडे रां. रं :– चारापाणी – साकेत प्रकाशन
  रिक्त अतिरिक्त – साकेत प्रकाशन
- वाघचौरे भिमराव :– रानखळगी – साकेत प्रकाशन
- जाधव सरदार :– कोयता – जनशक्ती वाचक चळवळ
- पाटील तानाजी :– आभाळ – संस्कृती प्रकाशन
- कोळी अशोक :– पाडा – शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर,
- रविंद्र शोभणे :– पांढर – मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,
- कैलास दौंड :– कापूसकाळ – मीरा बुक्स, औरंगाबाद
- दिवाकर चौधरी:– बुझर्वागमन – अनुबंध प्रकाशन
- शंकर सखाराम – एसईझेड – सामंत प्रकाशन, मुंबई.
- सुभाष किन्होळकर – झळ – साक्षात प्रकाशन, औरंगाबाद
- राजन गवस – ब–बळीचा – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

संदर्भग्रंथ सूची

- ठाकूर रविंद्र :– मराठी ग्रामीण कादंबरी, मेहता प्रकाशन, पुणे 1993
- बांदिवडेकर चंद्रकात :– मराठी कादंबरीचा इतिहास
- देशपांडे बालशंकर :– कादंबरी विवेचन आणि विश्लेषण
- शिरवाडकर के. र. :– साहित्यातील विचारधारा
- बोराडे रा. र. :– ग्रामीण साहित्य
- मुलाटे वासुदेव :– ग्रामीण साहित्य –स्वरूप व दिशा, ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही
- पाटील मोहन :– ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2008
- प्रदिक्षणा खंड भाग 1 व 2 :– अनिरूद्ध कुलकर्णी, कॉन्स्टनेन्टल प्रकाशन, पुणे
- कोत्तापल्ले नागनाथ :– साहित्याचा अवकाश, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध.
- गुंदेकर श्रीराम :– ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन, दिलीप प्रकाशन, पुणे ,1915
- यादव आंनद :– ग्रामीण साहित्य स्वरूप आणि सामर्थ्य, मेहता प्रकाशन,पुणे, 2016
- पाध्ये दिंगबर :– साहित्य समाज आणि संस्कृती, लोकवाङ्मय प्रकाशन मुंबई, 2005

- कऱ्हाडे सदा. :— साहित्य व समाज
- नलगे चंद्रकुमार :— ग्रामीण साहित्याचा इतिहास
- यादव आंनद :— ग्रामीण साहित्य आणि वास्तव
- भोसले द. ता. :— ग्रामीण साहित्य एक चितंन, मेहता प्रकाशन, पुणे.
- देशमुख गणेश :— ग्रामीण समाजजीवन व साहित्य
- भोसल द. ता. :— ग्रामीण साहित्याचा इतिहास, अजब प्रकाशन, कोल्हापूर
- यादव आंनद :— 1960 नंतरची सामाजिक स्थिती, साहित्यातील नवे प्रवाह, मेहता प्रकाशन पुणे.
- म. फुले :— शेतकऱ्यांचा आसूड
- हरी नरके :— संपा. य. दी फडके :— महात्मा फुले समग्र वाङ्मय, म.रा.सा. मंडळ,
- द.ता. भोसले, यादव आंनद :— मराठी ग्रामीण कथा खंड 2 स्नेहवर्धन प्रकाशन,

ललित , अक्षरधारा, किशोर शेतकरी मासिक , इ. विविध नियतकालिके , लेख इ.